# पोलीस अधिकारी / गुन्हे अन्वेषन अधिकारी यांना मार्गदर्शक सूचना

१ ज्याप्रकरणात सात वर्षे पर्यंत किंवा त्याहुन अधिक कारावासाच्या शिक्षेची तरतुद आहे अशा प्रकरणात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचा वापर करण्यात यावा.

२ तपासी अधिकारी/पोलीस नियंत्रण कक्ष/पोलीस ठाणे यांच्या कडुन आवश्यकते प्रमाणे मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन वरील अधिका-यांना व्हॅन वरील उपलब्ध भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधावा.

३ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स गुन्हा स्थळी आल्यानंतर फॉरेन्सिक व्हॅन्स मधील अधिकारी/कर्मचारी गुन्हा स्थळाला संरक्षित करतील. फॉरेन्सिक तज्ञ गुन्हा स्थळाचे नियंत्रण घेतील व तेथे इतर कोणीही हस्तक्षेप करणार नाही याची काळजी घेतील.

४ फॉरेन्सिक तज्ञ, मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन व त्यामधील किटस, सामग्री इत्यादी करीता स्थानिक पोलीसांनी गुन्हे स्थळी सुरक्षा व्यवस्था दयावी.

५ गुन्हा स्थळावरुन फॉरेन्सिक तज्ञ आवश्यक नमुने गोळा करतील तसेच फॉरेन्सिक तज्ञांना गुन्ह्या विषयी अधिक माहिती आवश्यक असल्यास सदर माहिती तपासी अधिकारी यांनी उपलब्ध करुन दयावी.

६ फॉरेन्सिक तज्ञ आवश्यक नमुने गोळा केल्यानंतर सहायक संचालक यांच्या मान्यतेने Crime Scene Report तयार करतील व सदर Crime Scene Report ची प्रिंट घेतील.

७ सदर Crime Scene Report वर फॉरेन्सिक तज्ञ स्वाक्षरी करून त्यावर तपासी अधिकारी यांची स्वाक्षरी घेतील.

८ फॉरेन्सिक तज्ञ Crime Scene Report व गोळा केलेले नमुने संबंधित तपासी अधिकारी यांना देतील.

९ संपूर्ण प्रक्रीयेत ब्लॉकचैन यंत्रणेचा उपयोग करण्यात आलेला आहे, त्या अनुषंगाने फॉरेन्सिक तज्ञांनी गुन्हा स्थळी भेट दिल्यापासून ते गुन्हा स्थळ सोडेपर्यंत वेळेनुसार तज्ञांनी केलेली प्रत्येक कृतीची माहिती Crime Scene Report सोबत ब्लॉकचैन कोड द्वारे नमुद राहील. सदर माहिती Crime Scene Report सह तपासी अधिका-यांना देण्यात येईल.